## प्रेसनोट दि. १५.०६.२०२१

ग्रामपंचायत करगणी ता. आटपाडी जि. सांगली येथील सरपंच श्री गणेश लक्ष्मण खंदारे वय ३९ वर्ष यांना ४०,०००/- रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे कॉन्ट्रॅक्टर असून त्यांनी ग्रामपंचायत करगणी येथून नवबौध्द समाज गल्ली शेटफळे रस्ता कॉक्रीट करणेचे काम घेतलेले आहे. सदर कामाचे बिल मंजूर करून जमा केलेचे मोबदल्यात ग्रामपंचायत करगणी ता. आटपाडी जि. सांगली येथील सरपंच श्री. गणेश खंदारे यांनी बिलाच्या ४ टक्के रक्कम लाच म्हणून मागीतली असलेबाबत तक्रारदार यांनी दि.१५.०६.२०२१ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक १५.०६.२०२१ रोजी केले पडताळणीमध्ये ग्रामपंचायत करगणी ता. आटपाडी जि. सांगली येथील सरपंच श्री. गणेश खंदारे यांनी तक्रारदार यांच्याकडे ४०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच ग्रामपंचायत कार्यालयाजवळ सापळा लावला असता त्यावेळी ग्रामपंचायत करगणी ता. आटपाडी जि. सांगली येथील सरपंच श्री. गणेश लक्ष्मण खंदारे वय ३९ वर्ष यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रूपये लाचेची मागणी करून ४०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द आटपाडी पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगली यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, संजय कलकुटगी, अविनाश सागर, संजय संकपाळ, सलीम मकानदार, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in